**नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी सन २०१५-१६ मध्ये शाळांची निवड करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः नप्रउ २३१५/(३३/१५)/प्रशिक्षण**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २१ एप्रिल, २०१५

**प्रस्तावना -**

राज्यामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून शिक्षणा विषयी विविध कार्यक्रम वेगवेगळ्या उद्दिष्टांनी राबविण्यात येत आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये बालकांना बालस्नेही वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरण व शाळांची आहे. यासाठी लागणारी आवश्यक तरतूद केंद्र शासन व राज्य शासनाकडून वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत मंजूर केली जाते. सन २०१५-१६ मध्ये राज्यामध्ये ३६ जिल्ह्यांमध्ये ४०८ गट / शहर साधन केंद्रांतर्गत ६,१७० समूह साधन केंद्रांमध्ये १.०४ लाख प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू आहेत. या सर्व शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे.

भारत सरकारची राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या संस्थेने केलेले राष्ट्रीय स्तरावरील संपादणूक सर्वेक्षण, राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी केलेले राज्य स्तरावरील संपादणूक सर्वेक्षण, विविध संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालामधून विद्यार्थ्यांची गुणवत्ता समाधानकारक नसल्याचे दिसून येते. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. विभागामध्ये बहुतांशी शिक्षक स्वयंप्रेरणेने गुणवत्ता वाढीसाठी प्रत्यक्ष काम करताना दिसून येतात. प्राथमिक शिक्षणामध्ये भाषा व गणित या विषयात नाविन्यपूर्ण काम करणारे शिक्षक प्रत्येक तालुक्यामध्ये आहेत. भाषा व गणित विषयात काम करणारे प्रयोगशील शिक्षक ज्या शाळेत कार्यरत आहेत अशा शाळांची प्रत्येक गट / शहर साधन केंद्रातून शाळा निवडून त्यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

सन २०१५-१६ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवोपक्रमामध्ये निवडक शाळांना गुणवत्ता वाढीसाठी विशिष्ट कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूद भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाने मंजूर केली आहे. सदरहू कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करीता शाळा निवडीबाबतचे निकष पुढीलप्रमाणे राहतील-

१) **<u>सहभागी शाळांची संख्या</u> :** प्रत्येक समूह साधन केंद्रांतर्गत एक शाळा.

२) **<u>शाळेचे व्यवस्थापन</u> :** जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका.

३) **शाळा निवडीसाठी आवश्यक बाबी :-**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक शाळेने शैक्षणिक वर्षातील विदयार्थ्यांच्या गुणवत्तावाढीबाबतचा प्रस्ताव तयार करावा. यामध्ये कार्यक्रमाचे उद्दिष्टे, गुणवत्तावाढीसाठी संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी अपेक्षित सुधारणेचे उद्दिष्ट, निधी विनियोगात आणावयाच्या बाबी व आराखड्याचा समावेश असावा.

(२) हा प्रस्ताव तयार करीत असतांना त्यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती, पालक, स्थानिक शिक्षण तज्ज्ञ यांना सहभागी करुन घ्यावे.

(३) सदरचा प्रस्ताव सादरीकरणाच्या स्वरुपात आठ मुद्यावर आधारित स्लाईड तयार करुन संबंधित स्तरावरील निवड समिती समोर सादर करावा.

(४) निवड समिती योग्य निकषाच्या आधारे शाळांचे नियोजन व अंमलबजावणीची खात्री करुन शाळांची निवड करेल. तथापि, ज्या शाळा यामध्ये निवडल्या जाणार नाहीत अशा शाळांनी गुणवत्तावाढीकरिता प्रस्तावात नमूद केलेल्या बाबी पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.

४) **शाळांची निवड करण्याची जबाबदारी :**

(१) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी ग्रामीण क्षेत्रातील तालुकांतर्गत जिल्हा परिषद शाळा व प्रशासनाधिकारी, नगरपरिषद व महानगरपालिका यांनी शहरी भागातील शाळांची निवड करावी.

(२) शाळांची निवड करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती गठीत करावी. या समितीमध्ये गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती व प्रशासन अधिकारी, नगरपालिका / महानगरपालिका यांचा समावेश राहील. तसेच या समितीमध्ये सर्व शिक्षण विस्तार अधिकारी, सर्व केंद्र प्रमुख, विषय साधनव्यक्ती व त्यांच्या कार्यक्षेत्रातील १२ ते १५ सक्रीय व क्रियाशिल शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश असावा. सदर समितीची बैठक गट/शहर साधन केंद्रस्तरावर संबंधित अधिकाऱ्यांनी बोलवावी.

(३) सदर बैठकीमध्ये तालुक्याचे सद्यस्थितीतील शैक्षणिक गुणवत्तेचे चित्र, प्रत्येकाचे अनुभव, चांगले काम करणाऱ्या शाळांची माहिती, अडचणींना तोंड देणाऱ्या शाळांची माहिती, मुलांच्या संपादणुकीत अपेक्षित बदल या सर्व घटकांवर चर्चा करण्यात यावी.

(४) प्रत्येक समूह साधन केंद्रासाठी वरील व्यक्तींपैकी ३ जणांची समिती गठीत करावी यामध्ये विषयसाधन व्यक्ती, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ यापैकी दोन आणि केंद्रप्रमुख यांचा समावेश राहील.

(५) सदर समितीने केंद्रातील सर्व शाळांचे सादरीकरण सर्वासमवेत पाहून पुढील निकषांच्या आधारे समूह साधन केंद्रातील एका शाळेची निवड करावी. सदर सादरीकरणाच्या वेळी सर्व शिक्षक उपस्थित असल्याने शाळा निवडीची प्रक्रिया पारदर्शी राहील.

(६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त समितीने खालील निकषांच्या आधारे निवडलेल्या प्रत्येक समूह साधन केंद्रातील एक शाळा याप्रमाणे जिल्ह्यातील सुमारे २०० शाळांची यादी राज्यस्तरावर पाठवावी.

**५) गट शिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी यांच्या निवड समितीने शाळा निवडताना खालील निकष विचारात घ्यावेत.**

**शाळा निवडीचे निकष :-**

(१) शाळेत किमान १-२ उत्साही शिक्षक असावेत.

(२) यापूर्वी शाळेने उपक्रमासोबतच शैक्षणिक गुणवत्तावाढीच्यादृष्टीने संपादणूक स्तर उंचाविण्यासाठी ठोस मुलभूत काम केलेले असावे.

(३) शाळेच्या सादरीकरणात कार्यक्रमाचे स्वरुप, अंमलबजावणीची दिशा, तपासण्याचे परिमाण, गुणवत्तेत वाढ करण्याचे अपेक्षित उद्दिष्टे (टक्केवारी) याबाबी स्पष्ट असाव्यात.

(४) सादर केलेला प्रस्ताव हा अंमलबजावणीस योग्य व दिशादर्शक असावा. तसेच त्यांची शाळा या उपक्रमांतर्गत निवडीस पात्र असल्याबाबत पटवून देणारा (Convincing) असावा.

(५) मुलांच्या संपादणुकीमध्ये सुधारणा होणार याबाबत सादरीकरण करणाऱ्या शिक्षकांना आत्मविश्वास असावा.

ज्या तीन व्यक्तींच्या समितीने गुणवत्ता वाढीसाठी शाळेची निवड केलेली आहे. त्यांनी पुढील प्रक्रियेत सुलभकाची भूमिका पार पाडावी व सदर शाळेला आवश्यक ती मदत वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी.

**६) आर्थिक तरतूद :**

निवडलेल्या शाळांना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवोपक्रम या लेखा शिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीमधून निकषानुसार शाळा व्यवस्थापन समितीकडे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**७) प्रस्तावाचा आराखडा व सादरीकरण :-**

मुद्दा १:- कार्यक्रमाचे नाव (एक स्लाईड),
पुढील प्रत्येक मुद्यासाठी जास्तील जास्त ३ स्लाईड

मुद्दा २:- पार्श्वभूमी - हा कार्यक्रम आखण्या मागची कारणे.

मुद्दा ३ :- वर्षभराच्या कार्यक्रमातून गाठावयाचे उद्दिष्टे

मुद्दा ४:- कार्यपध्दती - प्रकल्पाची प्रक्रिया

मुद्दा ५:- गुणवत्तेची कोणती माणके मोजणार व मोजमापाची पध्दती

मुद्दा ६:- निधी विनियोगाचा आराखडा

मुद्दा ७:- कार्यक्रमात सर्वाचा सहभाग रहावा, विश्वासपूर्ण वातावरण रहावे, पारदर्शकता रहावी यासाठी करावयाची कार्यवाही.

मुद्दा ८:- वर्ष अखेरीला अपेक्षित फलनिष्पत्ती व त्याचे मोजमाप.

मुद्दा ९:- कोणत्या विषयासाठी काम करणार.

**या बरोबरच काही प्रात्यक्षिक अथवा साहित्य सादर करावयाचे असल्यास त्याबद्दलचा तपशील.**

वरील प्रमाणे उचित कार्यवाही करुन शाळांची निवड करावी. ज्या शाळांची निवड या कार्यक्रमांतर्गत होऊ शकली नाही, अशा शाळांना इतर माध्यमातून जसे की, लोकसहभाग, त्यांच्या आराखड्यानुसार कार्यक्रम अंमलबजावणीसाठी प्रोत्साहित करावे. **निवड केलेल्या शाळांची यादी व अहवाल** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी **दिनांक १५ मे, २०१५ पर्यंत** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयास व शासनास पाठविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४२११२३८१२२७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nandkumar

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, cn=Nandkumar
Date: 2015.04.21 12:50:58 +05'30'

**(नंदकुमार भा.प्र.से.)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव.
२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.
४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, कुमठेकर मार्ग, पुणे.
५. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
६. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
९. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
१०.प्रशासनाधिकारी, नगरपालिका (सर्व).
११.शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर) जिल्हा परिषद (सर्व).
१२.शिक्षणाधिकारी / प्रशासनाधिकारी, महानगरपालिका (सर्व).